


Since 2002

Khadki Education Society's

# Shrimati Shakuntala Hemraj Mutha Chitrakala Mahavidyalay,

**Khadki, Pune 411 003**

Foundation | Drawing & Painting | Art Teacher Diploma (A.T.D.) | Art Master (A.M.)

**मान्यता क्र. :** पीअेआय/२००२/दोन/२३८१ दिनांक ११ सप्टेंबर २००२












# माहितीपत्रक
# PROSPECTUS

**महाराष्ट्र शासनमान्य विनाअुदानित**

कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

कला शाळा आवार, डॉ.डी.एन.रोड, मुंबई ४०० ००१

दूरध्वनी : (०२२) २२६२०२३१/३२

खडकी शिक्षण संस्थेचे

## श्रीमती शकुंतला हेमराज मुथा चित्रकला महाविद्यालय

४९१, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग, (एंलफिन्सटन रोड) खडकी, पुणे ३.

फोन : ०२० ५८११४९१, ५८१७८९३, ५८१४५४१, ५८१३६५५

माहितीपत्रकासह प्रवेश अर्जाची किंमत : रु. २००

| | | |
|---|---|---|
| महाविद्यालय | : | खडकी शिक्षण संस्थेचे |
| | | **श्रीमती शकुंतला हेमराज मुथा चित्रकला महाविद्यालय** |
| पत्ता | : | ४९१, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग, एलफिन्स्टन रोड) खडकी, पुणे ३. |
| तालुका | : | हवेली जिल्हा : पुणे |
| दर्जा | : | विना अनुदानित, महाराष्ट्र शासनमान्य |
| स्थापना वर्ष | : | सन २००२ |
| पत्ता | : | ४९१, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग, (एंलफिन्सटन रोड) खडकी, पुणे ३. |
| टेलिफोन नंबर | : | ०२० ५८११४९१, ५८१७८९३, ५८१४५४१, ५८१३६५५ |
| रेल्वे स्टेशन | : | पुणे, शिवाजीनगर, खडकी |
| एस.टी. बस स्टेशन | : | स्वारगेट, पुणे व शिवाजीनगर |
| पी.एम.टी. बस थांबा | : | स्वारगेट,खडकी बाजार, डेक्कन बस क्र. १०,११ |
| | | वारजे कोथरुड ते खडकी बाजार बस क्र. ९६ |
| | | मनपा ते खडकी बाजार - रेंजहिल्स मार्गे ११६ |
| वसतिगृह (विद्यार्थी / विद्यार्थिनी) | : | नाही |

**- महाविद्यालयीन कामकाज -**

वेळ : सकाळी ८.०० ते दुपारी २.३०

मधली सुट्टी : सकाळी ११ ते ११.३०

**- कार्यालयीन कामकाज -**

ग्रंथालय : सकाळी ९ ते दुपारी २

कार्यालय : सकाळी १० ते सायंकाळी ५

# Our Faculty

**Mr. Balekhan Pathan**
Principal (G.D. Art Painting)

**Mr. Dinesh Lokhande**
Professor (A.T.D., G.D. Art Painting, Dip.Ed, M.F.A.- Print Making)

**Mr. Kamlesh Patil**
Lecturer (G.D. Art Painting, Dip.Ed.)

**Mr. Rajendra Awadhutkar**
Visiting Faculty (A.T.D., G.D. Art Painting, A.M., M.A.- Indology)
Indian & Western | History of Art & Culture | Aesthetics

**Mr. Mohan Charya**
Visiting Faculty (G.D. Art Painting)
Clay Work

**Mr. Girish Nanaware**
Visiting Faculty (G.D. Art Painting, Edu-Psychology)
Calligraphy

**Mr. Chandrakant Bhurewar**
Clerk

**Mr. Shridhar Pilley**
Peun

**Mr. Ratan Salvi**
Peun

## संस्थेमध्ये या शैक्षणिक वर्षात शिकविण्यात येत असलेले विविध अभ्यासक्रम (शासनमान्य उच्चकला अभ्यासक्रम) (विनाअनुदानित)

| | | | |
|---|---|---|---|
| **अ)** | सर्व विभागांसाठी अत्यावश्यक असलेला मुलभूत अभ्यासक्रम म्हणजेच फाऊंडेशन कोर्स | कालावधी | १ वर्ष |
| **ब)** | चित्रकला शिक्षक प्रशिक्षण पदविका (नवीन अभ्यासक्रम)(ए. टी. डी.) (१२ वी नंतर) | कालावधी | २ वर्षे |
| **क)** | जी.डी.आर्ट पेंटींग - डिप्लोमा अभ्यासक्रम | कालावधी | ४ वर्षे |
| **ड)** | ए.एम. (आर्ट मास्टर - प्रमाणपत्र अभ्यासक्रम) | कालावधी | १ वर्ष |

## कला अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी विहीत केलेली अर्हता

**अ)** मुलभूत अभ्यासक्रम (गुणवत्तेनुसार प्रवेश)
(महाराष्ट्र शासन : उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग, मंत्रालय, मुंबई- ३२.
शासन निर्णय क्र. एईडी- १२९/ (२२५) तांत्रि ५ दि. २०-९-१९९४)

मुलभूत अभ्यासक्रमाला सन. १९९५-९६ पासून प्रवेश देताना इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेडपरीक्षेचे श्रेणीनिहाय मूल्यांकन व त्यामध्ये शालान्त परीक्षेची टक्केवारी (१० वी एस. एस.सी.) मिळवून गुणवत्ता ठरविण्यात आली आहे.

**श्रेणीनिहाय मूल्यांकन पुढीलप्रमाणे :**

१. शालांत परीक्षा उत्तीर्ण टकेवारी + इंटरमिजिएट ए ग्रेडचे मूल्यांकन ४० = एकूण बेरीज

२. शालांत परीक्षा उत्तीर्ण टक्केवारी + इंटरमिजिएट बी ग्रेडचे मूल्यांकन ३० = एकूण बेरीज

३. शालांत परीक्षा उत्तीर्ण टक्केवारी + इंटरमिजिएट सी ग्रेडचे मूल्यांकन २० =एकूण बेरीज

**टीप** : विद्यार्थी इंटरमिजिएट ग्रेड परीक्षा उत्तीर्ण ने होता त्याने केवळ शालांत परीक्षेत ड्रॉईंग विषय घेताना असेल तरच खालीलप्रमाणे ड्रॉईंग या विषयात मिळणाऱ्या ग्रेडचा विचार करण्यात येईल. प्रवेशाच्या बाबतीत इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड परीक्षा उत्तीर्ण असल्यास शालान्त परीक्षेतील ड्रॉईंग या विषयातील गुणांचा विचार केला जाणार नाही.

४. शालांत परीक्षा उत्तीर्ण टक्केवारी + शालांत परीक्षेतील ड्रॉइंग (Practical) या विषयातील **ए** श्रेणीचे मूल्यांकन २० = एकूण बेरीज

५. शालांत परीक्षा उत्तीर्ण टक्केवारी + शालांत परीक्षेतील ड्रॉइंग (Practical) या विषयातील **बी** श्रेणीचे मूल्यांकन १५ = एकूण बेरीज

६. शालांत परीक्षा उत्तीर्ण टक्केवारी + शालांतपरीक्षेतील ड्रॉइंग (Practical) या विषयातील **सी** श्रेणीचे मूल्यांकन १० = एकूण बेरीज

शालांत प्रमाणपत्र परीक्षा (१० वी) किंवा तत्सम परीक्षा व महाराष्ट्र राज्याची इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड परीक्षा उत्तीर्ण झालेल्या किंवा महाराष्ट्र राज्याची शालांत परीक्षा 'कला' (प्रात्यक्षिक) विषय घेऊन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनाच फक्तप्रवेश देण्यात येतील. इतर राज्यातील शालांत परीक्षा उत्तीर्ण झालेले विद्यार्थी जरी ते ती परीक्षा 'कला' (प्रात्यक्षिक) विषय घेऊन उत्तीर्ण झालेले असले तरी त्यांनी महाराष्ट्र शासनाची इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड परीक्षा उत्तीर्ण केली असली पाहिजे.

मुलभूत पदविका अभ्यासक्रमासाठी शालांत परीक्षा उत्तीर्ण झालेल्या नव्या विद्यार्थ्यांप्रमाणेच जुन्या म्हणजेच त्यामागील वर्षात शालांत परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना नवीन विद्यार्थ्यांसमवेत गुणवत्तेनुसार मुलभूत अभ्यासक्रमाच्या वर्गात प्रवेश देण्यात येतील. उदाहरणार्थ, मुलभूत पदविका अभ्यासक्रमासाठी सन २० या सालात शालांत परीक्षा (१० वी) उत्तीर्ण झालेले विद्यार्थी व सन २० तसेच सन २० या साली उत्तीर्ण झालेले विद्यार्थी यांना मलुभूतअभ्यासक्रमाच्या वर्गात नवे विद्याथर्धी म्हणून प्रवेश देण्यात येतील. त्याचप्रमाणे २ वर्षाआधी शालांतपरीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची शालांत परीक्षेतील गुणांच्याटक्केवारीतून २ टक्के कमी करून टक्केवारी धरण्यात येईल. म्हणजे १९९९ चा विद्यार्थी जुना विद्यार्थी समजून त्याची शालांतपरीक्षेची टक्केवारी २ टक्क्यांनी कमी धरून या क्रमाने जितकी वर्षे अगोदर विद्यार्थी उत्तीर्ण झाला असेल तितके टक्के कमी करून शालांत परीक्षेचे गुण धरण्यात येतील.

याशिवाय विद्यार्थी जर शालांत परीक्षेत काही विषयातील सूट घेऊन उत्तीर्ण झाला असेल तर त्याची टक्केवारी केवळ ३५ इतकीच धरण्यात येईल.

**ब) नवीन चित्रकला शिक्षक प्रशिक्षण पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी विहित केलेली अर्हता चित्रकला शिक्षक प्रशिक्षण पदविका (नवीन) अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्ष वर्गातील प्रवेशाकरिता महाराष्ट्र राज्याची उच्च माध्यमि शालांत परीक्षा (इयत्ता १२ वी) कला, वाणिज्य व शास्त्र यापैकी कोणत्याही शाखेतून उत्तीर्ण**

**तसेच महाराष्ट्र राज्याची इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेडपरीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. ही शैक्षणिक अर्हता प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांनाच गुणवत्तेनुसार चित्रकला शिक्षक प्रशिक्षण पदविका अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाला प्रवेश देण्यात येतील.**

चित्रकला शिक्षक प्रशिक्षण पदविका प्रथम वर्ष अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना चित्रकला शिक्षक प्रशिक्षण पदविका अभ्यासक्रम द्वितीय वर्षाला गुणवत्तेनुसार प्रवेश देण्यांत येतील. कोणत्याही परिस्थितीत उपरोक्त वर्गात इतर संस्थेतील विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येणार नाहीत.

**तसेच मुक व बधीर विद्यार्थ्यांना चित्रकला शिक्षकप्रशिक्षण वर्गात प्रवेश देण्यात येणार नाहीत.**
सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षापासून जुना ए. टी. डी. अभ्यासक्रम पूर्णपणे बंद करण्यात आला असून कोणत्याही परिस्थितीत या जुन्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश दिले जाणार नाहीत.

**प्रवेश कार्यवाही बाबत :** मुलभूत अभ्यासक्रम, चित्रकला शिक्षण प्रशिक्षण वर्ग, रेखाकला व रंगकला आमि उपयोजित कला या विभागातील सर्व वर्ग यासाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी विहीत नमुन्यातील छापील अर्ज भरणे आवश्यक आहे. सदरील अर्ज संस्थेच्या माहितीपत्रकासह (कामाचे दिवशी दिलेल्या वेळेत) विक्रीसाठी उपलब्ध होऊ शकतील. प्रत्येक वर्गाच्या प्रवेशांबाबत शासकीय नियम व आदेश यानुसार आवश्यक त्या सर्व सूचना वेळोवेळी महाविद्यालयाच्या सूचना फलकावर पाहावयास मिळतील. त्यांची नोंद घेऊन विद्यार्थी व पालक यांनीप्रवेशासंबंधीची आवश्यक ती पूर्तता करणे जरूरीचे आहे. प्रत्येक विद्यार्थ्यांने छापील प्रवेश अर्ज- सुवाच्च अक्षरातव मराठी भाषेतच संपूर्णपणे भरणे आवश्यकआहे. शासकीय आदेशाप्रमाणे वदेण्यात येणाऱ्या सूचनांनुसार प्रत्येक प्रवेश अर्जांसोबत द्याव्या लागणाऱ्या दाखल्यांच्या प्रती प्रमाणित करून मिळणार नाहीत. दिलेल्या मुदतीनंतर प्रवेश अर्ज स्विकारले जाणार नाहीत. (प्रवेश कामकाजाची वेळ सकाळी ८ ते दुपारी २)

**शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश देताना मूळ प्रमाणपत्रे सादर करण्याबाबत :** नव्याने प्रथम प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी 'प्रवेश घेतानाच' आधीची संस्था सोडल्याचे मूळ प्रमाणपत्र तसेच इतर संबंधित सर्व मूळ प्रमाणपत्रे सादर केली पाहिजेत. जर असे प्रमाणपत्र दुसऱ्यासंस्थेत अथवा कार्यालयात जमा केले असल्यास त्या संस्थेकडून अथवा कार्यालयाकडून त्या संबंधीचे प्रमाणपत्र साद करणे आवश्यक आहे. तथापि अपवादात्मक परिस्थितीत मूळ प्रमामपत्र उपलब्द होऊ शकत नसल्यास दुय्यम प्रमाणपत्र स्विकारण्याचे अधिकार प्रवेशाधिकाऱ्यांना राहतील. मात्र दुय्यम प्रमाणपत्र सादर करावया लागणाऱ्या कारणाचे प्रतिज्ञापत्र सोबत जोडणे आवश्यक राहील. (शासन निर्णय क्र. टिईएम-१०९४ / ६३२७) तांशि-१ दि. ३० मे १९९४ : उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग, मंत्रालय मुंबई ३२.अन्वये)

**भारतीय संविधानानुसार व मंडळ आयोगाने केलेल्या शिफारशीनुसार महाविद्यालयात प्रवेशासाठी आरक्षण**
(महाराष्ट्र शासन : उच्च व तंत्रशिक्षण सेवायोजन विभाग : शासन निर्णय क्र. टिईएम १५८९४ /६३०३) तांशि- १, मंत्रालय विस्तारभवन, मुंबई ३२, दि. ३२, दि. ३ जून ९४) क्र. एडीआर - २०९४/ ६१०९३/२४३/ तांशि. ५ दि. २० जुलै १९९४)

**सन २० – २० या शैक्षणिक वर्षामध्ये विद्यार्थी प्रवेशासंबंधीची कार्यवाही खालीलप्रमाणे राहील.**
**अ)** मूलभूत अभ्यासक्रम **ब)** विशिष्ट कला विषयक पदविका प्रथम वर्षासाठी आलेल्या सर्व प्रवेश अर्जाची गुणवत्ता यादी अर्ज स्वीकृतीच्या अंतिम तारखेनंतर पाचव्या दिवशी सकाळी १० वा. संस्थेतील सूचनाफलकावर लावण्यात येईल. यादीतील कोणत्या क्रमांकापर्यंत गुणानुक्रमे प्रथमतः प्रवेश देण्यात येणार आहेत. या संबंधीची टीप तसेच पुढील (दुसरी) गुणवत्ता यादी सूचना फलकावर लावण्याची तारीख यादीमध्ये नमूद करण्यात येईल. गुणवत्ता यादीतील मुदतीमध्ये प्रवेश न घेतलेल्या विद्यार्थ्यांची नावे लाल शाईने रद्द करुन एकूण गुणवत्ता यादीतील पुढील विद्यार्थ्यांची दुसरी गुणवत्ता यादी सूचना फलकावर लावण्यात येईल. दुसऱ्या गुणवत्ता यादीत पहिल्या गुणवत्ता यादीतील शिल्लक सर्व प्रवेश जागांसाठी नावे असतील.

**विद्यार्थ्यांच्या प्रवेशाचे नियोजन पुढीलप्रमाणे**
अ) प्रवेश मर्यादा संख्येपर्यंत प्रवेश देण्यात आलेल्या विद्यार्थ्यांनी प्रवेश न घेतल्यास गुणवत्ता यादीतील अशा विद्यार्थ्यांची नावे लाल शाईने रद्द करुन गुणवत्ता यादीतील पुढील विद्यार्थ्याची दुसरी गुणवत्ता यादी सूचना फलकावर लावली जाईल. दुसऱ्या गुणवत्ता यादीत पहिल्या गुणवत्ता यादीतील शिल्लक सर्व प्रवेश जागांसाठी नावे असतील. अशा विद्यार्थ्यांनी प्रवेश घ्यावयाचा कालावधी ३ दिवस. ब) उपरोक्त कालावधीनंतर प्रवेश शिल्लक राहिल्यास संस्थेतर्फे प्रवेश दिले जाणार नाहीत. या प्रवेशाबाबत कलासंचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई -१ यांच्याकडून मिळणारा निर्णय कलासंस्था व विद्यार्थी यांचेवर बंधनकारक राहील.

**प्रत्येक शैक्षणिक क्षेत्रातील सत्रारंभ, सत्रसमाप्ती व सुट्ट्यांचे नियोजन मा. कलासंचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, कला शाळा आवार, डॉ.दा.नौ.मार्ग, फोर्ट मुंबई-४००००१ यांचे परिपत्रक क्र. पी.ए.आय/२००२/दोन ७४७ दि. १६ एप्रिल २००२ या संदर्भानुसार राहतील.**

## नियम :

**अ) सर्व साधारण नियमावली**

(उपयोजित कला, रेखाकला व रंगकला व चित्रकला शिक्षक प्रशिक्षण, आर्ट मास्टर प्रमाणपत्र कोर्स, डिप.ए.एड. इत्यादी विविध अभ्यासक्रमांकरिता)

१. सर्व विद्यार्थ्यांसाठी त्यांचा अभ्यास व वर्तणूक याविषयी महाविद्यालयाचे पदाधिकारी यांनी वेळोवेळी घालून दिलेले विशेष आणि सर्व साधारण नियम विद्यार्थ्यांवर बंधनकारक राहतील.

२. महाविद्यालयातर्फे घेतल्या जाणाऱ्या चाचण्या व परीक्षांना सर्व विद्यार्थ्यांनी उपस्थित राहणे तसेच अध्यापकांनी दिलेल्या सूचनांप्रमाणे 'टयुटोरिअल्स'च्या वेळी हजर असणे आवश्यक आहे.

३. सर्व विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेचा दर्जा टिकवण्यासाठी व वाढविण्यासाठी मा. कला संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई १ यांनी घालून दिलेले सर्व नियम महाविद्यालयांना लागू राहतील आणि हे नियम मूलभूत अभ्यासक्रम, रेखाकला व रंगकला, उपयोजितकला, चित्रकला शिक्षक प्रशिक्षण, आर्ट मास्टर प्रमाणपत्र, डिप.ए.एड. इत्यादी विविध अभ्यासक्रमांकरिता प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनाही बंधनकारक असतील. प्रत्येक विद्यावर्षातील एकूण कामकाजाच्या दिवसांपैकी किमान ७५ टक्के वर्गातील पूर्ण वेळ उपस्थिती आणि सर्व वर्गकामांच्या एकूण गुणांपैकी किमान ४० टक्के गुण असणे ह्या दोन्ही बाबींची पूर्तता होणे आवश्यक आहे. या नियमांचे काटेकोरपणे पालन करणे याकडे विद्यार्थी व पालक यांनी जागरुकतेने लक्ष पुरविणे जरुरीचे आहे हे नियम व कायदे न पाळणाऱ्या विद्यार्थ्यांना महाराष्ट्र शासनाच्या उच्चकला परीक्षा व अंतर्गतपरीक्षा यासाठी उपस्थित राहू दिले जाणार नाही.

४. सर्व विद्यार्थ्यांनी, आपली शैक्षणिक प्रगती व महाविद्यालयातील इतर कार्यक्रम इ. बाबत आवश्यक ती माहिती आपल्या पालकांना वेळोवेळी व ठराविक कालावधीनंतर पुरवित राहणे अपेक्षित आहे. महाविद्यालयात आपल्या पाल्याला शिक्षणासाठी पाठविताना संबंधित संस्था व महाविद्यालयाचे नियम व कायदे यांची माहिती करुन घेणे व त्यांच्या पालनाबाबत जागरुक राहणे सर्व पालकांकडून अपेक्षित आहे. त्यासाठी व आपल्या पाल्याच्या प्रगतीसाठी पालक महाविद्यालयाशी संपर्क साधू शकतात.

५. विद्यार्थ्यांनी स्वतःच्या शैक्षणिक साहित्य व सामग्रीची स्वतः काळजी घेणे आवश्यक आहे. इतरांच्या साहित्यासंदर्भात एखाद्या विद्यार्थ्याने काही गैरप्रकार केलेला आढळल्यास किंवा कोणत्याही प्रकारे संस्थेच्या/महाविद्यालयाच्या इमारतीचे अथवा इतर मालमत्तेचे नुकसान केल्यास त्याच्याकडून आवश्यक ती नुकसान भरपाई वसूल केली जाईल व संस्थेकडे/महाविद्यालयाकडे जमा कॉशन मनीची रक्कम त्याला परत दिली जाणार नाही.

६. वर्ग सुरु होण्याच्या वेळापासून विद्यार्थ्याने वर्गात उपस्थित असणे आवश्यक आहे. वर्ग संपण्याच्या वेळेआधी वर्गशिक्षकांच्या पूर्वपरवानगीशिवाय त्यांना वर्ग सोडता येणार नाही. तसे आढळल्यास त्या दिवशी त्यांची अनुपस्थिती मांडण्यात येईल. सातत्याने उशिरा येण्याची सवय विद्यार्थ्यांमध्ये आढळून आल्यास किंवा अन्य प्रकारे गैर वर्तणूक करणारे विद्यार्थी आढळल्यास ते शिक्षेस पात्र ठरतील.

७. पालकांच्या चिठ्ठीनुसार पूर्व परवानगीने मंजूरी घेतल्याशिवाय कोणत्याही विद्यार्थ्याला गैरहजर राहता येणार नाही आणि आजारपणासारख्या अपवादात्मक परिस्थितीत आवश्यक ते वैद्यकिय प्रमाणपत्र, पुन्हा वर्गात हजर होतानांच सादर करावे लागेल.

८. प्रथम सत्राच्या सुरुवातीस शैक्षणिक फी भरणे आवश्यक आहे. फी भरण्यासंबंधी आवश्यक ती पूर्व सूचना दिली जाईल. दिलेल्या मुदतीत फी न भरल्यास प्रवेश दिला जाणार नाही./प्रवेश रद्द केला जाईल.

९. शैक्षणिक वर्षाच्या सुरवातीस प्रत्येक विद्यार्थ्याने प्रवेश अर्ज भरणे आवश्यक आहे. घरचा पत्ता बदलल्यास त्याची त्वरीत कार्यालयात लेखी नोंद करणे जरुरीचे आहे.

१०. विद्यार्थ्यांनी केलेले वर्गकाम त्यांनी त्यांच्या वर्गातच ठेवणे बंधनकारक आहे.

११. विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट अशा निवडक कलाकृती महाविद्यालयाच्या संग्रहामध्ये ठेवून घेतल्या जातील.

१२. जे विद्यार्थी नियमाप्रमाणे उपलब्ध असलेल्या सवलती, शिष्यवृत्त्या घेऊ इच्छित असतील त्यांना संस्थेच्या वतीने शक्य ती सर्व मदत दिली जाईल. मात्र संबंधित अर्जाच्या पुढील कार्यवाही संदर्भात विद्यार्थ्यांनी संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्याशी सातत्याने संपर्क ठेवणे जरुरीचे आहे. कारण अशा प्रकारचे अर्ज नामंजूर झाल्यास मात्र संस्था त्यासाठी जबाबदार राहणार नाही. व अर्ज नामंजूर झाल्यामुळे त्याच्या नावे निघणारी सर्व बाकी रक्कम त्यास त्वरीत कार्यालयात भरावी लागेल.

१३. सविस्तर अभ्यासक्रमासाठी कृपया उच्च कला अभ्यासक्रमाची सुधारित आवृत्ती संदर्भासाठी पहावी आणि याबाबतची महाराष्ट्र शासनाची पुढील आवश्यक ती परिपत्रके यांची नोंद घेतली जावी.

**ब) परीक्षा नियम :**

शासकीय नियमाप्रमाणे सर्व अटी पूर्ण करणारे विद्यार्थीच सरकारी उच्चकला परीक्षा व अंतर्गत परीक्षा देण्यास पात्र ठरतील. विद्यार्थ्याकडून नियमांत कोणतीही त्रुटी आढळल्यास त्याला परीक्षेला बसण्याची परवानगी नाकारण्याचा व निकाल राखून ठेवण्याचा अधिकार प्राचार्यांकडे राहील.

१. मूलभूत अभ्यासक्रमाची सरकारी परीक्षा तीन वेळा अनुत्तीर्ण झालेले विद्यार्थी सदरील परीक्षा बाहेरुन पुन्हा देण्यास अपात्र ठरतील.

२. मूलभूत अभ्यासक्रम सरकारी परीक्षेतील प्रात्यक्षिक विषयांत ५० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त गुण असतील व तो विद्यार्थी सैध्दान्तिक विषयात (कला इतिहास) नापास झालेला असेल तर अशा विद्यार्थ्याला ए.टी.के.टी.म्हणून विशिष्ट कलाविषयक पदविका प्रथमवर्ष या वर्गात गुणानुक्रमे प्रवेश मिळेल. मात्र अशा विद्यार्थ्याचे गुण किमान ४० टक्के धरले जातील. त्यांना पुढील वर्षी अनुत्तीर्ण असलेल्या विषयाची परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक राहील.

३. पदविका परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना पुन्हा परीक्षा देताना प्रथम निवडलेला विषय बदलता येणार नाही.

**क) ओळखपत्र : नियम**

१. प्रत्येक विद्यार्थ्याने दरवर्षी नवीन ओळखपत्र घेतले पाहिजे. प्रवेश घेतेवेळी नियमाप्रमाणे असलेली ओळखपत्राची फी भरल्यानंतर विद्यार्थ्यांना महाविद्यालयातर्फे ओळखपत्र दिले जाईल.

२. त्यासाठी संबंधित विद्यार्थ्यांनी दोन आयकार्ड साईज फोटोग्राफ्स प्रवेश घेतानाच देणे आवश्यक आहे.

३. महाविद्यालयात असताना प्रत्येक विद्यार्थ्याने आपले ओळखपत्र जवळ बाळगणे जरुरीचे आहे आणि कोणत्याही कारणासाठी महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांनी मागणी केल्यास विद्यार्थ्याला ओळखपत्र सादर करावे लागेल.

४. घरचा पत्ता बदलल्यास त्याच्या योग्य त्या नोंदीसाठी विद्यार्थ्याने त्याची त्वरीत लेखी नोंद करणे आवश्यक आहे.

५. ओळखपत्राचा गैरवापर केलेला आढळल्यास त्या विद्यार्थ्याला कडक शासन केले जाईल.

६. ओळखपत्र गहाळ झाल्यास, संबंधित विद्यार्थ्याने ते हरविल्यापासून एक आठवड्याचे आत लेखी अर्ज देणे जरुरीचे आहे. त्यानंतर पुन्हा आयकार्ड फी भरुन त्यास ओळखपत्र (डुप्लिकेट) मिळू शकेल. ओळखपत्र हरविल्यासंदर्भात मुदतीत अर्ज न दिल्यास अथवा त्याबाबतचा खुलासा समाधानकारक न वाटल्यास डुप्लिकेट आयकार्डसाठी दंड आकारला जाईल.

## ड) ग्रंथालय : नियम

१. संस्थेच्या ग्रंथालयामध्ये कला विषयांची उत्तम, निवडक व दुर्मिळ पुस्तके आहेत. संस्थेच्या अधिकृत विद्यार्थ्यांनाच ग्रंथालयाच्या दिलेल्या वेळेमध्ये अभ्यास व संदर्भासाठी पुस्तके उपलब्ध होऊ शकतील.

२. विद्यार्थ्यांकडून पुस्तक फाटल्यास अथवा हरवल्यास त्याला, संस्थेच्या अधिकाऱ्यांनी ठरविलेल्या रकमेसह संबंधित पुस्तकाची त्यावेळी असणारी किंमत भरुन द्यावी लागेल.

३. ग्रंथालयामध्ये एकावेळी मासिकासह फक्त एकच पुस्तक संदर्भासाठी मिळेल आणि ते ग्रंथालय सोडण्यापूर्वी ग्रंथपालाकडे परत द्यावे लागेल.

४. विद्यार्थ्यांनी ग्रंथालयात/वाचनालयात शांतता राखणे जरुरीचे आहे. हा नियम न पाळता शांततेचा भंग करणारे विद्यार्थी अथवा विद्यार्थ्यांच्या संपूर्ण गटाला ग्रंथालय सोडून जाण्याविषयीचा आदेश ग्रंथपाल देऊ शकतात. आणि संबंधित विद्यार्थ्यांच्या गैरवर्तणूकीचा अहवाल व त्यांची नावे ते संस्थाप्रमुखांकडे सादर करतील.

५. कोणतेही कारण न देता, ग्रंथालयातील सदस्य विद्यार्थ्यांचे अधिकार व सवलती (एक अथवा अनेक) तात्पुरत्या काळासाठी स्थगित करण्याचे अधिकार ग्रंथपालांना राहतील आणि प्राचार्यांच्या मंजुरीनंतरच त्यांना त्या सवलती पुन्हा प्राप्त होऊ शकतील.

६. संस्थेच्या संग्रहातील किंवा ग्रंथालयातील चित्रे शिल्पे व तत्सम संदर्भ विद्यार्थ्यांनी फोटोग्राफ्सच्या स्वरुपात प्रोजेक्ट अथवा प्रबंधासाठी पूर्व परवानगीने वापरता असेल तर अभ्यासाच्या पूर्ततेनंतर संबंधित फोटोच्या निगेटिव्हज त्यांना त्वरित ग्रंथालयात जमा कराव्या लागतील. तसेच त्यांचा फक्त अभ्यासक्रमाच्या दृष्टीकोनातून उपयोग करता येईल. त्याचा अन्यथा वापर हा अनाधिकृत मानला जाईल व त्यास महाविद्यालये/संस्था जबाबदार असणार नाही आणि संस्थेच्या अधिकृत संदर्भाचा दुरुपयोग कारवाईस पात्र ठरेल.

## इ) फी परत मिळण्याविषयीचे नियमः

(शासन निर्णय : शिक्षण विभाग, क्र.ए.इ.बी.२२७१-१२९-५८५ दि.१३ मार्च १९७२)

शासनमान्य अशासकीय कला संस्थेमध्ये विद्यार्थ्याने प्रवेशाचे वेळी भरलेली शिक्षण फी-खालीलप्रमाणे नमूद केलेल्या परिस्थिती व मर्यादेमध्ये त्याला परत मिळू शकेल. मात्र त्यासाठी फी परत मिळणेविषयीचा लेखी अर्ज व पावती त्या विद्यार्थ्याने संस्था प्रमुखांकडे सादर केलेले असले पाहिजे.

१. विद्यार्थ्याने प्रत्यक्ष फी भरलेल्या दिनांकापासून संस्था सोडणेविषयी फी परत मागणीचा अर्ज जर १५ दिवसांच्या आत अधिकृतपणे सादर केलेला असेल तर प्रथम सत्रासाठी त्यांनी भरलेल्या प्रत्यक्ष फी पैकी ५० टक्के त्यास परत मिळू शकेल.

२. वर नमूद केलेल्या मुदतीनंतर अर्ज देणाऱ्या विद्यार्थ्याच्या संपूर्ण फी रकमेपैकी कोणतीही रक्कम त्यांना परत देता येणार नाही.

३. प्रत्यक्ष भरलेल्या शिक्षण फी ची संपूर्ण रक्कम विद्यार्थ्याला परत देता येईल, जर –

   १. त्याला तात्पुरत्या स्वरुपाचा प्रवेश देण्यात आला असेल आणि नंतर तो रद्द करण्यात आला असेल तर.

   २. किंवा जर त्याला अन्य स्वरुपाच्या फक्त इंजिनिअरींग, सायन्स, तंत्रशिक्षण अथवा तत्सम स्वरुपाच्या व्यावसायिक पदवी/पदविका अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळाला असेल आणि

   अ. त्याबाबत त्या संस्थेत प्रवेश अर्ज भरतेवेळीच जर त्या वरीलपैकी एक वा अनेक कोर्सेससाठीच प्रवेश अर्ज भरल्याचे लेखी स्वरुपात निवेदन दिले असेल तरच, शिवाय,

   ब. जर त्याने व्यावसायिक अभ्यासक्रमाला प्रवेश घेतलेल्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत संस्थाप्रमुखांकडे लेखी अर्ज दिलेला असेल तर, अशा प्रकरणात लेखी अर्जासमवेत, त्याने प्रत्यक्ष प्रवेश घेतलेल्या व्यावसायिक संस्थेचे अधिकृत प्रमाणपत्र सादर केलेले असले पाहिजे व त्यामध्ये संबंधित विद्यार्थ्याच्या प्रवेशाची तारीख नमूद केलेली असणे आवश्यक आहे.

## विद्यार्थ्यांसाठी सर्वसाधारण सूचना

१. शिस्तीच्या तत्वांचे योग्य प्रकारे पालन, नियमितपणा आणि निर्विवाद आज्ञापालन अत्यावश्यक आहे.

२. आदब आणि भाषेतील व वर्तनामधील सौजन्य तसेच पोषाखातील आणि व्यक्तिगत स्वच्छता विद्यार्थ्यांकडून अपेक्षित आहे.

३. विद्यार्थ्यांच्या केवळ संस्थेमधीलच नव्हे तर बाहेरच्या सर्वसाधारण वर्तणुकीसाठी देखील जर तक्रार आली तर तो विद्यार्थी शिस्तभंगाच्या कार्यवाहीस पात्र राहील.

४. विद्यार्थ्यांना कोणत्याही अनिष्ट कार्यक्रमामध्ये सहभागी होता येणार नाही.

५. कोणासही न जुमानता सतत आज्ञाभंग करणाऱ्या किंवा पुन्हा पुन्हा अथवा बुध्दीपुरसकार खोडसाळपणा करणाऱ्या किंवा परीक्षांच्या संबंधात गैरव्यवहाराबाबत दोषी ठरणाऱ्या किंवा गंभीर गैरशिस्तीचे/गैरवर्तनाचे कृत्य ज्याने केले असेल अशा किंवा संस्थेच्या प्रमुखांच्या मते, ज्याचा त्याच्या सहाध्यायीवर अहितकारक प्रभाव असेल

अशा कोणत्याही विद्यार्थ्याला संस्थेचा प्रमुख कायमचा काढून टाकू शकेल किंवा पदावरुन विनिर्दिष्ट कालावधीसाठी दूर करु शकेल आणि त्याच्या कारणांची लेखी नोंद घेऊ शकेल.

६. विद्यार्थ्यांनी वर्गासाठी वेळेवर उपस्थित राहणे आवश्यक आहे. अनियमित विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसारख्या अन्य व इतर सुविधा, सवलती व लाभ मिळणार नाहीत.

**७. महाविद्यालयाचा दूरध्वनी विद्यार्थ्यांना वापरता येणार नाही.**

८. विद्यार्थ्यांना कोणताही अर्ज अथवा निवेदन देणे आवश्यक असल्यास त्यांनी ते संबंधित शिक्षकांच्या अथवा वर्गाच्या अध्यापक प्रमुखांमार्फतच प्राचार्याकडे देणे आवश्यक आहे.

९. अभ्यासक्रमांच्या अनुषंगाने आवश्यक असलेले सर्व साहित्य विद्यार्थ्यांना स्वतः आणावे लागेल.

१०. सरकारी परीक्षेच्या वेळी विद्यार्थ्यांना ड्रॉइंग बोर्ड स्वतंत्रपणे स्वतः आणावा लागेल. तो संस्थेतर्फे दिला जाणार नाही.

११. कमीत कमी ७५ टक्के उपस्थिती असण्याच्या अटीवर राखीव अथवा बिनराखीव विद्यार्थ्यांना नियमाप्रमाणे असणाऱ्या संबंधित शिष्यवृत्त्यांचा लाभ मिळू शकेल. अन्यथा त्या रद्द केल्या जाऊन विद्यार्थ्यांना संपूर्ण फी भरावी लागेल. या शर्ती संहिता आणि कला संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई किंवा निरीक्षक चित्रकला व शिल्प, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी वेळोवेळी काढलेल्या निदेशान्वये असून, विद्यार्थ्यांना संस्थेमध्ये कोणत्या शर्तीवर दाखल करुन किंवा ठेवून घेतले जाईल याचा अधिकार संस्थेकडे आहे. या संदर्भात मातापिता किंवा पालक, संस्था चालकास हुकूम फर्मावू शकत नाहीत.

## शैक्षणिक वर्ष २०  – २०  फी तपशील

महाराष्ट्र शासनाच्या वतीने मा. कला संचालक, म.रा.मुंबई यांनी ठरवल्यानुसार शासनमान्य अशासकीय कला संस्थामध्ये शिकविण्यात येणाऱ्या विविध अभ्यासक्रमांसाठी एकूण फी आकारण्यात येते.)

**शासकीय आदेशानुसार फीमध्ये बदल होऊ शकणे संभवनीय आहे व बदल झाल्यास त्याप्रमाणे फी भरावी लागेल.**

स्नेह संमेलन, शैक्षणिक सहल, फोटोग्राफी, मुद्रा चित्रण या विषयाची फी संबंधी वर्ग प्रतिनिधी बैठकीत (जी.एम.सी) ठरल्याप्रमाणे जमा करावी लागेल.

# गुणवत्ता शिष्यवृत्ती

एकूण विद्यार्थी ५ मर्यादेपर्यंत गुणवत्ता शिष्यवृत्त्या देण्यात येतील.

१) महाराष्ट्र शासनाने घेतलेल्या आधीच्या सरकारी परीक्षेमध्ये ज्यांना दुसरा वर्ग मिळालेला असेल अशा विद्यार्थ्यांकरिता दरमहा रु.

२) महाराष्ट्र शासनाने घेतलेल्या आधीच्या सरकारी परीक्षेमध्ये ज्यांना पहिला वर्ग मिळालेला असेल अशा विद्यार्थ्यांकरिता दरमहा रु.

**टीप** : पूर्वाध्ययन वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत आधीची सरकारी परीक्षा म्हणजे माध्यमिक प्रमाणपत्र किंवा तिच्याशी तुल्य असलेली परीक्षा होय.

गुणवत्ता शिष्यवृत्त्या एक वर्षासाठी किंवा संबंधित विद्यार्थ्यांची नियमित उपस्थिती, चांगली वर्तणूक आणि समाधानकारक प्रगति यांच्या आधीन असतील.

## महाविद्यालयातील सांस्कृतिक कार्यक्रम व इतर उपक्रम :

शैक्षणिक वर्षाच्या कामकाजाची सुरुवात झाल्यानंतर प्रत्येक वर्गामधून प्रतिनिधींची (विद्यार्थी/विद्यार्थीनी) निवड करण्यात येते. विद्यार्थी प्रतिनिधींमधून त्यानंतर 'जनरल सेक्रेटरी' याची निवड होते. अध्यापकांच्या सहकार्याने सांस्कृतिक कार्यक्रम व इतर उपक्रमांच्यासाठी आवश्यकतेनुसार सर्व प्रतिनिधींच्या, वेळोवेळी प्राचार्य जीएमसी च्या बैठकी आयोजित करतात आणि सर्वानुमते ठरविण्यात येतील ते सर्व कार्यक्रम व उपक्रम वर्षभरामध्ये पार पाडले जातात. त्याचे स्वरुप एकत्र आणि वर्गाप्रमाणे स्वतंत्रही असू शकते. यामध्ये शिक्षक दिन, विविध स्पर्धा, शैक्षणिक सहली, निरोप समारंभ वगैरे कार्यक्रम घेण्यात येतात.

राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील कला स्पर्धेतून विद्यार्थी भाग घेऊ शकतात. त्याचप्रमाणे, तज्ञांची व्याख्याने, प्रात्यक्षिके, स्लाईड शो, कला मेळा, प्रदर्शने (स्टेट आर्ट सह) फिल्म शो, मॅगझिन इत्यादी उपक्रमांचे आयोजन करण्यात येते.

गुणवंत व विशेष नैपुण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ साजरा करण्यात येतो.

याशिवाय पुरुषोत्तम करंडक, फिरोदिया करंडक, मूड इंडिगो, सीड वगैरेसाठी विद्यार्थी सहभागी होऊ शकतात.

# विविध कला विभागांचे अभ्यासक्रम

# SYLLABUS

## FOUNDATION COURSE (PUBLIC EXAMINATION)

Duration: the Foundation Course is of one year's duration. After successful completion of the foundation Course the student will be admitted to the specified course in :

| | | |
|---|---|---|
| 1. | Drawing & Painting * (Foundation) | 1 year duration |
| 2. | Sculpture and Modelling (Proposed) | 4 Years duration |
| 3. | Applied Art | 4 Years duration |
| 4. | Art Teacher's Training* | 2 Years duration |
| 5. | Ceramics of pottery | 2 Years duration |
| 6. | Textile design (Printing & dyeing) | 2 Years duration |
| 7. | Textile design (weaving) | 2 Years duration |
| 8. | Furniture and Interior Design | 2 Years duration |
| 9. | Metal Craft | 2 Years duration |

* Only these courses are being conducted in this Mahavidyalaya.

**O B J E C T I V I E S --------------------------------**

Knowing the atrist's tools and materiala and finding their possibillities and limitations through series of free and elaborate exercises. Understanding of the basic form and the fundamentals of drawing and design. Trainingin observation and expression. This covers the training of bothe the theory and practical which together forms the understanding of space in compositions are relatively placed. In the practical application these fundamentals are applied in drawing and design where student lerns to see nature in a subjective way and understands the basic relationship between seeing and feeling- Thus he is made familiar with visual perception of form and matter which are related objects of nature. He is also taught through series of exercises, how an artist sees and express, how an artist sees and expressess, how most of the objects have more than one meaning. Ultimately the end of such a course is to built up an awareness in the students about man's creative expressions and through the practical assignments offering them an opportunity to realise their own potentiallity and limitations.

## ¨ SUBJECTS ¨

The following subjects will be taught in this consure,

**FOUNDATION**

**MAJOR HEADS :**

1) DRAWING 2) DESIGN 2-D
3) DESIGN 3-D 4) COLOUR
5) PIRNT-MAKING 6) HISTORY OF ART IN INDIA
(Study assignment details)

## ¨DETAILED SYLLABUS ¨

**1) Drawing**

**1. Natuire Drawing**

a) To develolp the sense of structure, study from any kind of forms in nature, ponds, shells, butterfiles, flowers, plants, insects, minerals bones, etc. To understand how these forms achieve their structural unity through adherence to principal consistent with physical nature of the materials being observed and studies through various rendering media and techniques in various light conditions.

b) Drawing from Human Figure- Mainly based on general form and gesture.

**II) Drawing from object :**
Drawing from cubes, cones, cylinderical objects, casts, drapery, still-life group etc. observed and techniques in various light conditions.

**III) Drawing Memory**
To develop the sense of observation and /or the capacity of retain image and their coordination.

**IV) Introduction to Elements Perspective :**

Study of basic solid plan and elevation, main aspects of parallel and 2 angular perpective.

**V) Calligraphy :**

a) Basic discipline of beautiful hand - writing, sense of letter from smullaneous judgement of the composition of letter spacing, organisation initative and logical planning of writing development of style.

b) A co-ordinated assignment of script- writing with different types of traditional and modern tools. Students should be exposed to Calligraphic examples of various traditional scripts.

